# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:10.10.2024** **वार:गुरुवार**

---

1. उद्योग आणि मानवीय कार्यातील अग्रणी रतन नवल टाटा यांचं निधन, दूरदृष्टि असलेलं एक अद्वितीय व्यक्तिमत्व हरपल्याची देशभरात भावना
2. पंतप्रधानांच्या हस्ते राज्यातील 7 हजार 600 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची पायाभरणी, 10 शासकीय वैद्यकीय महाविद्यालयांचं उद्घाटन
3. रिझर्व्ह बँकेच्या द्वैमासिक पतधोरण आढाव्यात प्रमुख व्याजदर जैसे थे आणि
4. टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये भारतीय महिला, पुरुष संघांचे विक्रमी फरकाने विजय

**रतन टाटा-निधन**

भारतीय स्वातंत्र्योत्तर काळात उद्योगासह देशाच्या जडण-घडणीत सोज्वळ मानवीय योगदान देणारे रतन नवल टाटा यांचं काल मुंबईत निधन झालं. ते 87 वर्षांचे होते. त्यांच्या निधनाबद्दल देशभरातून हळहळ व्यक्त होत आहे. जीवनकार्य अंकित करण्यासाठी शब्दही तोकडे पडतील असं उत्तुंग व्यक्तिमत्व रतन नवल टाटा यांना लाभलं होतं, त्यांनी ते आजीवन सार्थकी लावलं...

**भारताच्या सर्वोच्च उद्यमी आणि कोट्यधीशांमध्ये रतन टाटा यांनी स्वतःचं अतिशय वेगळं स्थान निर्माण केलं. बहुतांश मान्यवर उद्योजकांच्या तुलनेत आपल्या संपूर्ण टाटा समूहाचं दोन दशकांहून अधिक काळ नेतृत्व करताना त्यांनी अद्वितीय दूरदृष्टी, भक्कम नैतिकता आणि महत्वाकांक्षी जागतिक अधिग्रहण हे सर्वकाही अतिशय संयत प्रतिष्ठा आणि लालित्यानं परिवर्तन घडवलं. भारताच्या आर्थिक इतिहासात टाटा समूहाचा वारसा लक्षणीय तर आहेच, त्यातील रतन टाटा यांची ऐतिहासिक भूमिका निःसंशय अधोरेखित राहील. स्थापत्यशास्त्रामध्ये पदवीप्राप्त रतन टाटा 1962 मध्ये टाटा समूहात कार्यरत झाले. 1981 मध्ये टाटा उद्योगाचे ते अध्यक्ष झाले. 1991 ते 2012 पर्यंत टाटा सन्सचे अध्यक्ष म्हणून काम करताना त्यांनी समूहाचा महसूल अब्जावधींवर नेला. जनसामान्यांची कार टाटा नॅनोच्या आविष्कारासह प्रवासी वाहन विभागात टाटा मोटर्स त्यांनी पुढे आणली. चहा, शीतपेयं, दूरसंचार, दागिने, एयर इंडिया, एक ना अनेक क्षेत्रांमध्ये टाटा उद्योग त्यांच्या भविष्यवेधी नजरेतून विस्तारला. आम्ही पोलाद देखील निर्माण करतो असं नम्रपणे सांगणाऱ्या टाटा परिवाराप्रमाणे समाजासाठीचं आपलं देणं ते सातत्यानं देत राहिले, शिक्षणापासून आरोग्यापर्यंत लक्षावधी लोकांच्या जीवनाला स्पर्श करुन त्यांनी अनेक गावांमध्ये परिवर्तन घडवून आणलं. अनेक पुरस्कारांच्या पलिकडले पुरस्कार रतन नवल टाटा यांनी आपल्या आजीवन कार्यातून मिळवले, अजरामर केले. आकाशवाणीच्या बातम्यांसाठी मंदार कुलकर्णी, पुणे.**

रतन नवल टाटा यांच्या पार्थिव देहावर आज संपूर्ण शासकीय इतमामानं अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. आज राज्यात एक दिवसाचा दुखवटाही जाहीर करण्यात आला आहे.

**<u>पीएमराज्य</u>**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते काल राज्यातील 7 हजार 600 कोटी रुपयांच्या विविध विकास प्रकल्पांची दूरदृष्य प्रणालीद्वारे पायाभरणी करण्यात आली. नागपूर आंतरराष्ट्रीय विमानतळ अद्ययावत करण्याचा यात समावेश आहे. शिर्डी विमानतळाच्या नव्या एकात्मिक टर्मिनल इमारतीच्या कामाचीही पंतप्रधानांनी पायाभरणी केली. मुंबई, नाशिक, जालना, अमरावती, गडचिरोली, बुलडाणा, वाशिम, भंडारा, हिंगोली आणि ठाणे जिल्ह्यातील अंबरनाथ इथल्या दहा सरकारी वैद्यकीय महाविद्यालयांचं कार्यान्वयनही काल पंतप्रधानांनी केलं. याशिवाय मुंबईतल्या भारतीय कौशल्य संस्थेचं तसंच राज्यातल्या विद्या समीक्षा केंद्राचं उद्घाटनही काल मोदींच्या हस्ते झालं.

नाशिक इथल्या शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाच्या उद्घाटनाबद्दल, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या कुलगुरू माधुरी कानिटकर प्रतिक्रिया व्यक्त करताना म्हणाल्या....

वाशिम इथं वैद्यकीय महाविद्यालय सुरू झाल्याबद्दल नर्सिंगचं प्रशिक्षण घेत असलेल्या सायली अवचार या विद्यार्थिनीनं समाधान व्यक्त केलं, ती म्हणाली......

**<u>फोर्टिफाईड तांदूळ</u>**

पंतप्रधान गरीब कल्याण अन्न योजनेअंतर्गत कृत्रिमरीत्या पोषणमूल्यांनी युक्त अर्थात फोर्टिफाईड तांदळाचा मोफत पुरवठा डिसेंबर 2028 पर्यंत सुरू ठेवण्यास केंद्रीय मंत्रिमंडळानं काल मंजुरी दिली. रक्ताल्पता आणि सूक्ष्म पोषक घटकांच्या कमतरतेची समस्या कमी करण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचं माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव यांनी सांगितलं. फोर्टिफाईड तांदळाचा पुरवठा करण्याच्या या योजनेच्या अंमलबजावणीसाठी 17 हजार 82 कोटी रुपयांच्यावर खर्च अपेक्षित आहे.

**<u>रेपो दर</u>**

भारतीय रिझर्व बँकेनं पतधोरणाच्या सलग 10 व्या आढाव्यात व्याजदरात कोणतेही बदल न करण्याचा निर्णय काल घेतला. त्यामुळे रेपो दर पूर्वीप्रमाणेच साडेसहा टक्के, स्थायी ठेव सुविधा अर्थात स्टँडींग डिपॉझिट फॅसिलिटी दर सव्वा सहा टक्के आणि मार्जिनल डिपॉझिट फॅसिलिटी दर पावणे सात टक्के राहणार आहे. यावेळच्या चलनविषयक धोरणात चलन फुगवट्याबाबत सध्या तटस्थ भूमिका स्वीकारण्याचा निर्णयही पतधोरण समितीनं घेतला. किरकोळ चलनफुगवट्याचा दर चार टक्के पर्यंत रोखण्याच्या दृष्टीनं आणि विकासाला पाठबळ देण्याच्या दृष्टीनं हा निर्णय घेतल्याचं समितीनं म्हटलं आहे.

**<u>लाडकी बहीण- रायगड</u>**

मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना कायमस्वरुपी सुरु राहणार आहे. या योजनेसाठी 46 हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. तसंच सध्या दिली जात असलेली दरमहा 1 हजार 500 रुपयांची रक्कम वाढवत जाऊन टप्प्याटप्प्याने ही रक्कम तीन हजार रुपयांपर्यंत करण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी काल राज्यस्तरीय वचनपूर्ती कार्यक्रमात रायगड जिल्ह्यातील मोर्बा इथं दिली.

**पोहरानदी**

नागपूर इथली पोहरा नदी दक्षिण नाला क्षेत्रामधून वाहात असलेल्या सांडपाण्यामुळं अत्यंत प्रदूषित झाली आहे. हे प्रदूषण कायम स्वरूपी बंद करण्यासाठी तसंच नैसर्गिक जलस्त्रोत अबाधित राखण्याकरिता 957 कोटी रूपयांचा नदी प्रदूषण निर्मूलन प्रकल्प राबविण्यात येणार असल्याचं नागपूरचे पालकमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल सांगितलं.

**रत्नागिरी-स्थानक**

सुशोभित रत्नागिरी रेल्वेस्थानकाचं लोकार्पण काल सार्वजनिक बांधकाममंत्री रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते तसंच जिल्ह्यातल्या खेड, चिपळूण, संगमेश्वर आणि राजापूर या अन्य रेल्वेस्थानकांचं लोकार्पणही दूरस्थ पद्धतीनं करण्यात आलं.

**क्रिकेट**

महिलांच्या टी-ट्वेंटी विश्व करंडक क्रिकेट स्पर्धेत भारतानं श्रीलंकेवर काल दुबई इथं 82 धावांनी विजय मिळवून एक विक्रम केला. त्यामुळं अ गटात भारत क्रमवारी आणि धावसंख्येच्या प्रमाणात वरचढ ठरला आहे. हरमनप्रीत कौर आणि स्मृती मन्धना यांच्या अर्धशतकांच्या बळावर भारतानं केलेल्या 172 धावांचा पाठलाग करताना श्रीलंका संघ विसाव्या षटकात सर्वबाद 90 धावा करु शकला.

इकडे पुरुषांच्या टी-ट्वेंटी क्रिकेटमध्ये बांग्लादेशविरुद्ध दिल्ली इथं दुसरा सामना भारतानं 86 धावांनी जिंकून तीन सामन्यांच्या मालिकेत विजयी आघाडी घेतली. भारतानं दिलेलं 222 धावांचं उद्दिष्ट गाठताना पाहुणा संघ वीस षटकांत 9 बाद 135 धावा करु शकला. उभय संघांचा तिसरा सामना शनिवारी हैदराबाद इथं होणार आहे.

**हवामान**

राज्यात काल पुणे, नाशिक अशा काही ठिकाणी पावसानं पुन्हा हजेरी लावली. कोकण, मध्य महाराष्ट्र, मराठवाडा आणि विदर्भात जोराचे वारे आणि वीजांसह पावसाचा इशारा हवामान विभागानं दिला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.